श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय :– मंगळवार, दि. १३ सप्टेंबर, २०२२ रोजी अंगारकी संकष्टी चतुर्थी निमित्त नाष्टा व विशेष जेवण बनविणे कामाच्या मजुरीचे दरपत्रके मागविण्याबाबत.**

मंगळवार, दि. १३ सप्टेंबर, २०२२ रोजी अंगारकी संकष्टी चतुर्थी निमित्त चहा–नाष्टा, जेवण–विशेष जेवण बनविणे, जेवण वाढणे, भांडी धुणे व इतर कामाच्या मजुरीची दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

## अटी व शर्ती

१. मंगळवार अंगारकी संकष्टी चतुर्थी दि. १३ सप्टेंबर, २०२२ रोजीकरीता नाष्टा व विशेष जेवण बनविण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.
२. दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्च मिळून व कर वगळून दराचा उल्लेख करावा.
३. दरपत्रकधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.
४. नाष्टा व जेवणाची संख्या कमी जास्त प्रमाणात झाल्यास मान्य दरानेच काम करावे लागेल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.
५. दरपत्रकधारकाने दरपत्रकात GST क्रमांक नमूद करावा. सोबत GST नोंदणी दाखल्याची प्रत न्यासास सादर करावी.
६. स्वयंपाकासाठी लागणारी अतिरीक्त सर्व भांडी, शेगडया, पंगत व बुफेसाठी टेबल खुर्च्यांची व्यवस्था करणे.
७. चहा–नाष्टा व जेवण बनविण्याच्या संपूर्ण पूर्वतयारीसह स्वयंपाक वाढणे, अंदाजे ३४०० कंटेनर पार्सल करणे, ताटे–भांडी धुणे, साफसफाई करणे इ. सर्व कामे करावी लागतील.
८. देयक सादर दिनांकापासून १५ दिवसानंतर देयकाची रक्कम फर्मच्या नावे R.T.G.S. ने अदा करण्यात येईल.
९. कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.
१०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.
११. दरपत्रकधारकाने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे
    अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड
    ब) सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला
१२. सिलबंद लिफाफ्यावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा
१३. दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात **शनिवार, दि. १० सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यत** न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील स्वागत कक्षावर सादर करावेत.
१४. दरपत्रके **शनिवार, दि. १० सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी २.०० वाजता ऊघडण्यात येतील.**

(नंदा राऊत)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## <u>दरपत्रकाचा तपशील</u>

विषय :– मंगळवार, दि. १३ सप्टेंबर, २०२२ रोजी अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त नाष्टा व विशेष जेवण बनविणे कामाच्या मजुरीबाबत.

दरपत्रक धारकाचे नाव :------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------

पॅन कार्ड क्रमांक :------------------------------------------------

जी एस टी क्रमांक :------------------------------------------------

| नाष्टा व जेवण बनविण्याच्या कामाचा तपशील | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | कामाचा तपशील | एकूण व्यक्ती | एकत्र मजुरी दर रुपये (कर वगळून) सर्व समावेशक खर्च |
| १ | दि. १२ सप्टेंबर, २०२२–रात्रीचे जेवण : दाल खिचडी/पुलाव (कंटेनर पार्सलसह) | ६०० | रुपये......................./– |
| २ | दि. १३ सप्टेंबर, २०२२–सकाळचा नाष्टा : शिरा/उपमा किंवा पोहे, चहा/कॉफी, साबुदाणा खिचडी व साबुदाणा वडे (७५० कंटेनर पार्सलसह) | १००० | रुपये......................./– |
| ३ | दि. १३ सप्टेंबर, २०२२–दुपारचे जेवण : मसाले भात/पुलाव, सुकी भाजी, पुरी, लोणचे व साबुदाणा खिचडी (७५० कंटेनर पार्सलसह) | १००० | रुपये......................./– |
| ४ | दि. १३ सप्टेंबर, २०२२–संध्याकाळचा नाष्टा : बटाटे वडे/भजी, चटणी (६०० कंटेनर पार्सलसह) | ८०० | रुपये......................./– |
| ५ | दि. १३ सप्टेंबर, २०२२–रात्रीचे विशेष जेवण : साधा भात, मसाले भात/पुलाव, वरण, ऊसळ/आमटी, सुकी भाजी, रस्सा भाजी, बासुंदी/जिलेबी, मिक्स भजी/कोथिंबीर वडी, पुरी/चपाती, ऊकडीचे मोदक, चटणी, पापड, लोणचे, कोशिंबीर, ताक | ५०० | रुपये......................./– |
| | | एकूण मजुरीची रुपये | रुपये......................./– |

टिप – दरपत्रक सादर करताना जेवण बनविण्याच्या कामासहित जेवण वाढणे, भांडी धुणे व इतर कामासाठी लागणारे मजुर विचारात घेऊन दर सादर करावेत. आवश्यक सर्व भांडी, गॅस शेगडया व टेबल–खुर्च्या कवरसह (अंदाजे ५० टेबल व १०० खुर्च्या) कंत्राटदाराच्या असतील.

दरपत्रकधारकाची सही व शिक्का